# प्रकरण - ४

## शिवाजी सावंत यांच्या कादंबरीतील नायक

मागील प्रकरणात शिवाजी सावंतांच्या 'मृत्युंजय' 'छावा' व 'युगंधर' या तिन्ही कादंब-यांचे मराठी कादंबरी विश्वातील वेगळेपणाचा परामर्श घेतल्यानंतर या संशोधन विषयाच्या मुख्य गाभ्याकडे वळायचे आहे. शिवाजी सावंतांच्या सर्वच कादंब-या नायक प्रधान आहेत. हे स्थूल वैशिष्ट्य चटकन दृष्टीस येते. त्याचा सखोल अभ्यास करताना आणखी अनेक वैशिष्ट्ये लक्षात येतात. लेखकाच्या दृष्टीकोनातून आणि समीक्षकाच्या दृष्टीकोनातून या घटकावर अभ्यासपूर्ण व साधार असा प्रकाश झोत याप्रकरणात पाडावयाचा आहे.

# कर्ण



'महाभारत' हा ग्रंथ भारतीय संस्कृतीचे अमोल धन आहे. त्याचा भारतीय समाज मनावर विलक्षण प्रभाव असून त्यामध्ये धर्म, राजकारण, समाजीवन, सांस्कृतिक, वैभव व्यक्त झाले आहे. त्याच सोबत या मधून मानवी स्वभावाचा विविध वृत्ती आणि प्रवृत्ती व्यक्त झालेल्या आहेत. त्याच भारताच्या प्राचीन साहित्य परंपरेच्या विचारांना आणि भारतीय साहित्यिक प्रतिभेला आवाहन देणा-या आहेत. कौरव - पांडवांच्या ? सत्ता संघर्षाच्या युगात संपूर्ण मनुष्य प्राण्याचे जीवन कसे संघर्षमय बनले होते. याचे अत्यंत प्रत्ययकारी व विस्मयजनक आविष्करण व्यासांनी महाभारतामध्ये केले होते. या सत्ता संघर्षामध्ये अनेक व्यक्ती गुंतल्या गेलेल्या होत्या. शीलसंपन्न, तत्वनिष्ठ, विवेकी, शूर, महारथी, प्रभावशाली अशा त्या व्यक्ती होत्या. ही सर्व गुणवैशिष्टये एकाच व्यक्तिमत्वामध्ये सामावलेली परंतु भारतीय समाजाच्या वर्ण व्यवस्थेच्या प्रभावाखाली वावरणारी एक अत्यंत प्रभावशाली व्यक्तीरेखा महाभारताच्या व्यासपीठावर अत्यंत गौण व त्रोटक स्वरूपात वावरताना दिसते. ती म्हणजे 'कर्ण' होय. वस्तुत: शुद्ध क्षत्रिय असणारा परंतु सुत नावाच्या संकर जातीच्या कुटूंबात वाढल्या कारणाने राज्याधिकारापासून वंचित राहिलेला कर्ण म्हणजे दैवाकडून सारे मिळूनही खंक, रिकामा राहिलेला महापुरूष वाटतो. याच जाणिवेतून महाभारतातील कर्णाकडे साहित्यिकांचे लक्ष वेधले गेले. त्यातूनच कर्ण जीवनावर अनेक नाटके, कादंब-या, कथा अशाअनेक कलाकृती निर्माण झाल्या. या मधील एक प्रमुख कलाकृती म्हणजे ' शिवाजी सावंत' यांची १९६७ साली प्रकाशित झालेली 'मृत्यूंजय' ही कादंबरी एका तेजस्वी परंतु उपेक्षित वीराला 'कवीचान्याय' (Poetic Justic) देण्याच्या दृष्टीकोनातून ही कादंबरी साकार झालेली दिसते.

श्रीकृष्ण आणि कर्ण या वास्तविक एकाच तात्विक भूमिकेच्या पौरूषचैतन्याच्या, वर्ण निर्भयतेच्या आणि निर्मलतेच्या दोन प्रतिमा आहेत. एका प्रतिमेला दैवी स्तरावर ठेवणे.' व्यासांना आवडले. दुसऱ्या प्रतिमेला पार्थिव स्तरावर ठेवले.[१] परिणामी श्रेष्ठ गुणवत्ता जन्मजातच व प्रयत्नाने अर्जित केलेल्या कर्णाचे समग्र जीवन एक लक्तर ठरले. मात्र ते लक्तर नव्हते. तर ते जरीकाठाचं एक तलम राजवस्त्र होते. केवळ-केवळ परिस्थितीच्या निर्दयी कटेरी कुंपणात अडकून त्याच्या सहस्त्र चिंध्या झाल्या होत्या.[२] ही कर्ण व्यथा लेखकाने समग्र कर्णचरित्र चित्रीत करीत असताना प्रदिर्घतेने रंगविलेली आहे.

कर्णाची व्यक्तिरेखा लेखकाच्या मनात कुमारवयात केलेल्या नाटकातील श्रीकृष्णाच्या भूमिकेपासून रूजत गेली. कर्णाच्या व्यक्तिरेखेने लेखकाला आकर्षित केले.त्यानंतरच्या काळात महाभारत विषयक जे जे साहित्य लेखकाला मिळाले ते ते त्यांनी वाचले. काही जाणीवपूर्वक मिळवून वाचले आणि आपणास भावलेल्या कर्णाच्या व्यक्तिरेखेला लेखकाने अधिकाधिक आशयघन केले. शिवाजी सावंतांच्या 'मृत्युंजय'

चा नायक 'कर्ण' हे त्यांना भावलेले भावसत्य आहे. तो भावनायक आहे. महाभारत हे महाकाव्य आहे. तो जवळपासच्या काळातील इतिहास नाही. त्या महाकाव्यातही काळपरत्वे भर पडत गेली. काही प्रछन्न भाग आला. एखादया सुंदर मूर्तीला सत्ता संपत्तीच्या जोरावर सण उत्सवाच्या निमित्ताने वस्त्रालंकारांनी विभूषित करावे. त्याप्रमाणे प्रतिभावंतांनी आपल्या प्रतिभेने 'महाभारत' अधिक रमणीय केले.

महाभारतावर आधारित कोणत्याही कलाकृती मधून महाभारताचा वस्तुनिष्ठ इतिहास. त्यातील प्रसंत्र, पात्रे रेखाटली गेलीत असे म्हणता येत नाही. तसेच महाभारताचे वास्तव साहित्य कृतीतून झुगारले असेही म्हणता येत नाही. महाभारत हे प्रतिभेला विषय पुरविणारे महासागर आहे. याचा उपयोग करून घेऊन भारतातील अनेक प्रतिभावंतांनी आपापल्या साहित्य कृती साकारलेल्या आहेत.

मराठी कादंबरी विश्वात 'मृत्युंजय' कांदबरीने लोकप्रियतेची कमाल उंची गाठली असून वाङ.मयीन गुणवत्तेच्या दृष्टीनेही ही कादंबरी यशस्वी ठरली आहे.

परंतु याच काळात काहींना महाभारताच्या वास्तवाचे भान आले. या वास्तवाच्या ऐरणीवर कर्णाच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग घेतला गेला. त्यानुसार आक्षेप घेतले गेले. वास्तविक प्रतिभावंताचे 'भावसत्य' उभे राहते ते त्याला भावलेल्या आशयावरून हा आशय त्या प्रतिभावंताच्या अनुभूती विश्वाच्या काळातील न्यायाच्या मापदंडाने साकार झालेला असतो.

'मृत्युंजय' हया कर्णाच्या जीवन गाथेच्या अनुषंगाने लेखकाने कर्णाच्या जीवनाच्या विविध अंगांना सविस्तर स्पर्श केला आहे. त्याच सोबत कर्णाच्या मनात अहोरात्र सुरू असलेला भावनिक संग्राम देखील लेखकाने प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कर्णाच्या मानसिक प्रेरणांचा अनुभव वाचकांना 'मृत्युंजय वाचित असताना होतो.

'मृत्युंजय' या कादंबरीत लेखकाने मूळ कर्ण चरित्रातील सर्वच्या सर्व प्रसंग मुळ बर हुकूम चितारले आहेत. असे नाही तर कर्णचरित्रातील सर्व मूळ प्रसंगांचा कादंबरीत समावेश केला आहे. पण त्या प्रसंगांची मांडणी त्यातील तपशील यात बराच बदल करून लेखकाने ते प्रसंग चितारलेले आहेत.

### १) जन्मजातच मोठेपणाची दर्शनीय ग्वाही मिळणारा कर्ण :-

अगदी शैशकाला पासून आपली जीवन काहणी सांगणाऱ्या कर्णाचे बालपण मुक्त आणि अनिर्बंध कल्पनांचे घोडे जोडलेला एक स्वैर रथ असावा[३] असा पिता अधिरथ व माता राधा यांच्या

वात्सल्याच्या छायेत अतिशय सुखाने व्यतित होत-होते. त्याची माता घटकांन-घटका कर्णाच्या कानांतील कुंडलांकडे स्वत:ला विसरून उगाच एकटक पाहत असे व नगर जनांशी या संदर्भात चर्चा देखील करीत असे.[४] मात्र अशी कवच कुंडले केवळ कर्णालाच कशी लाभली हे रहस्य कधी उलगढले गेले नाही.

कर्णांच्या लहान भावाला शत्रुतपंन उर्फ शोणाला सुध्दा या कर्ण कुंडलांचे कौतुक वाटे आणि मला कुंठ आहेत. ती कुंडल[५] अशी गोड तक्रार सुध्दा तो कर्णाकडे करे. हस्तिनापूरला आल्यावर सर्व प्रथम दुर्योधनाने देखील कर्णांच्या कुंडलांकडे एकटक पाहत ही तुझी कुंडल तुला जन्मजातच आहेत काय ?[६] असे कौतुक केले होते. तर धृतराष्टांनी सुध्दा आपल्या हातानी चाचपडून कुंडले बघितली आणि आश्चर्य व्यक्त केले गंगापुत्र भीष्मांनी सुध्दा ही कुंडल तुला फारच शोभून दिसतात त्यांना नेहमीच जपत जा.[७] अशा सल्ला दिला होता. एवढेच काय कर्णाला सुध्दा या बद्दल सतत गुढच वाटायचे याबद्दल आपल्या राधामातेला सुद्धा तो खोदून खोदून विचारायचा मात्र या त्याच्या प्रश्नाचं उत्तर त्याला कोणीच देऊ शकत नव्हते. तो निराश झाला मात्र आपल्या मुलांना तरी निश्चितच कवच कुंडले असतील असे कर्णाला वाटत होते. मात्र सुदामन वृषसेन, वृषकेतु, वृषभानु या पैंकी कुणालाच कुंडले नाहीत. म्हणून तो निराश झाला व आपल्या राधामातेला आणि वृषालीला सुदामनला कुंडले का नाहीत म्हणून पृच्छा करू लागला. मात्र याच कुंडलामुळे कर्णाच्या मनात एकच प्रश्न हत्तीचा पाय ठशासारखा खोलवर रूतून बसला- मी कोण आहे ? कुणी तरी सांगा मी कोण आहे?

जन्माबरोबर प्राप्त झालेला कवच कुंडलांच्या मुळे कर्ण हा अवध्य व अजिंक्य ठरत होता. याची कर्णाला सुध्दा संपूर्ण जाणीव होती. याचा कवच कुंडलांमुळे तो अर्जुनाला सुध्दा शरण जात नव्हता. म्हणून ती कवच कुंडले हरण करून नेणे इंद्राला अधिक योग्य वाटते. एका याचक ब्राह्मणाच्या रूपात येऊन त्याने ती कवच कुंडले कर्णाकडून दानात मिळवली. वास्तविक सुर्य देवांनी कर्णाला स्वप्नात येऊन निक्षुन सांगितले होते की, कवच कुंडले दिलीस तर तुझा सर्वनाश होईल.[८] मात्र याचक म्हणून दारात आलेल्या इंद्राला विन्मुख न पाठविण्याचा मानस कर्णाने व्यक्त केला कारण दान हा त्याच्या रक्ताचा धर्म होऊन गेला होता.[९] आपल्या दारातून कोणाताही याचक रिकाम्या हाताने परत जाता कामा नये. यासाठी त्याच्या मनाचा कोपरान कोपरा सदैव सावध होता. कर्णाच्या कवच कुंडलाचे हे वैशिष्टय लेखकाने कर्णाच्या कौटंबिक तसेच सार्वजनिक जीवनात समर्पकपणे खेळविले आहे. कर्णाने कवच कुंडलाचे केलेले दान जसे त्यांच्या कुंटुबियांना रूचले नव्हते. तसेच ते त्याच्या परममित्र दुर्योधनाला सुध्दा पटले नव्हते. कारण याच कवच कुंडलाच्या मुळे कर्ण अवध्य व अजिंक्य होता. म्हणून तोच केवळ पांडवांना

यमसदनी धाडू शकतो  असे दुर्योधनाला वाटत होते. मात्र कीर्तीची भुरळ पडलेल्या कर्णाने जिवंत असतांना कीर्ती मिळाली तर आत्मसन्माचे सौख्य तरी मिळेल. या भावनेतून दिलेल्या दानामुळे कीर्तीचा सोपान चढत असताना आपण कवच कुंडलांचे सामर्थ्य कमी करून बसल्याची भावना कर्णाच्या मनात तयार झाली.  काही अशुभ घडावयाचे असल्यास कर्णाची ही कुंडले निस्तेज होत असत. त्यामुळे जणू काहीती भविष्याची सुचनाच देत असत असेही कुंडला संबंधीचे वर्णन कादंबरी मध्ये आलेले आहे. अशी ही कर्णाची  कवच कुंडले गेल्यावर भीष्मांनी सर्व राजसमुदायासमोर त्याला 'अर्धरथी' ठरवले होते.  तेव्हा भीष्मांनी दोन कारणे दिली होती.  त्यातले एक म्हणजे कर्णाहा कवच कुंडलहीन होता, हे होते.

जन्मताच आपल्या अंगावर कवच कुंडलांच्या रूपाने मोठेपणाच्या खुणा घेऊन आलेल्या कर्णाच्या या शारीरिक वैशिष्ट्यांची शिवाजी सावंत यांनी अत्यंत प्रभावी व पुरेशी दखल घेतलेली दिसते.

## २)  तेजाचा उपासक असणारा सुर्यशिष्य कर्ण :-

कर्णाचे जन्मजात दुसरे वेगळेपण म्हणजे त्याला सूर्य आणि सूर्यकिरणा बद्दल असणारी अनाहुत ओढ. कर्ण खरा तर सूर्यपुत्रच होता. परंतु हे सत्य त्याला फार उशीरा म्हणजे कुरूक्षेत्रावरील युध्दापूर्वी श्री कृष्णाकडून कळाले होते.  त्यापूर्वी तो आपल्या जन्म रहस्या संबंधी अंधारातच होता.  परंतु त्याला लहान पणापासूनच तेज:पुंज सूर्य बिंबाकडे पाहिले की, एक प्रकारची आगळी हुरहुरच वाटे[१०] त्याचे अर्घ्यदान व सुर्योपासना कधी सुध्दा चुकली नाही. एवढेच नव्हे तर धर्नुविद्येसाठी सूर्य देवानांच गुरु मानण्यापर्यंतचे क्रांतीकारक पाऊल कर्णाने टाकलेले दिसते. एका चैतन्यधारी मानवी शरीराने विद्या देण्यासाठी स्वच्छ नकार देताच कर्णाने आपल्या असीम श्रध्देने जाज्वल्य निष्ठेने तेज: प्रपातालाच गुरु मानले व धर्नुविद्या अर्जीत केली. कारण प्रत्यक्ष गुरु जे देऊ शकत नाही. त्यापेक्षा गुरुविषयीचा सदभाव हा शिष्याला अधिक काही देऊन जातो.[११] हा विद्या संपादनातील सिध्दांतच जणू कर्णाने सुर्याला गुरु मानून सिध्द केलेला दिसतो. त्यामुळेच सूर्यदेवतेच्या दर्शनाचा, सूर्य किरणांचा त्याच्यावर गूढ परिणाम होत असे. तसेच सुर्यकिरणांचा सहवास त्याला हवाहवासा वाटत होता. परंतु त्याचे कारण मात्र कर्णाला ज्ञात नव्हते, असे कर्णानेच अनेकदा कबुल केले आहे.

अशा या सूर्य देवतेचे दर्शन जर उपासनेच्या वेळी झाले नाही तर आज काही तरी अघटीत घडणार अशी जाणीव कर्णाला घडत असल्याचे कादंबरीत दाखविण्यात आले आहे. प्रेक्षणगृह प्रसंगी व द्युतप्रसंगी कर्णाला अशीच जाणीव झाली होती. इतकी अगाढ श्रध्दा सूर्य देवाबद्दल असणाऱ्या कर्णाने

देवेन्द्राला कवच कुंडलांचे दान देताना सुध्दा 'सूर्यस्तोत्र' म्हणले आहे. इतकेच नव्हे तर कर्णाच्या अंतिम समयी सुध्दा त्याची प्राणजोत त्याला लाल-लाल सूर्यबिंबाकडे प्रचंड गतीने झेपावली[१२] असे शिवाजी सावंतांनी लिहीले आहे.

## ३) मी कोण आहे? याचा सतत शोध घेणारा-

जन्मजातच शरिरावर कवच कुंडलांच्या खुणा घेऊन आलेला, सूर्य किरणांच्या बद्दल व पाण्याबद्दल आकर्षण असणाऱ्या कर्णाला आपल्या या वेगळेपणामुळे एकच प्रश्न सतत बोचत होता तो प्रश्न होता. मी कोण आहे?

जन्मजातच आपल्याला लाभलेली कवच कुंडले आपल्या कोणत्याच बंधुला अथवा पुत्रांना नाहीत. हे कळल्यावर कर्ण या प्रश्नाच्या अस्तित्वामुळे जास्त संत्रस्त होत होता.

शिष्टाई करण्यासाठी आलेल्या श्री कृष्णाने ज्यावेळी कर्णाला तुझ कुळ श्रेष्ठ आहे! तुझा वारस दिव्य आहे! पांडव तुझे सख्ये बंधु आहेत! तू सर्वात पहिला पांडव आहेस! जेष्ठ कौंतेय आहेस![१३] हे धक्का देणारे सत्य जेव्हा सांगितले. तेव्हा कर्णाच्या मनात एकाच वेळी हर्ष, अभिमान, महानतेची जाणीव निर्माण झाली व आपण हीन नाही! क्षुद्र नाही! याचा आनंद कर्णाला झाला.[१४] असे 'मृत्युंजय' या कादंबरीत चित्रीत करण्यात आले आहे.

एखाद्या प्रसंगी जर कर्णाचा कुणी सुतपुत्र म्हणुन अपमान केला तर कर्णाच्या मनात त्याची सल बोचत राही. कारण सर्वानी कौतुक करावे असे कवच व कुंडले त्याच्याकडे होती. वास्तविक क्षत्रियाला सुध्दा जी लाभली नाहीत अशी कुंडले व कवच आपल्याला सुतपुत्र असून लाभलीत याचा अभिमान असावयास हवा मात्र तसा अभिमान कर्णाला जाणवत नव्हता. याचाच अर्थ कर्णाच्या विचारांची बैठक ही प्रगल्भ सारासार व स्थिर विचारावर उभी नव्हती. त्यामुळे त्याच्या मनात सतत परस्पर विरोधी विचारांचे व्द्वंव्द उठत होती.

## ४) हीन जातीवरुन उपेक्षिला जाणारा कर्ण-

कर्णाचे बालपण हे लतावेली व पशुपक्षांनी बहरलेल्या निसर्ग देवतेच्या कुशीत पहुडलेल्या चिमुकल्या 'चंपानगरीत' अधीरथ बाबा, राधामाता, शत्रुतपन उर्फ शोण आणि इतर मित्रांच्या सोबत अतिशय आनंदात व्यतीत होत होते. मात्र शिक्षणासाठी ज्यावेळी कर्ण कुरुंच्या संपन्न राजनगर 'हस्तिनापूरात' आला त्यावेळी त्याला खरा समाज पहावयास व अनुभवावयास आला. कुरुकुलातील

कौरव, पांडव यांचे जीवन त्याला जवळून पहावयास मिळाले. आणि त्याला सामाजिक भेदभावांचा अनुभव सुध्दा आला. युध्दविद्या ही केवळ क्षत्रियांचे कर्तव्य आहे.[१५] त्यामुळे कर्णासारख्या सुतपुत्राचे गुरुपद स्विकारायला कोण सुध्दा तयार नाही हे विदारक सत्य त्याला समजले.

आयुष्याच्या प्रारंभीच त्याला या कटू अनुभवामुळे समाजातील अन्यायाची कल्पना येऊ लागली. माणूस कितीही पराक्रमी असला तरी त्याचे मोठपण हे त्याच्या जन्म घेतलेल्या कुळावरच अवलंबून असते हे सत्य त्याला समजले. याच सत्या विरुध्द कर्णाने पहिले क्रांतीकारक पाऊल उचलले व सजीव शरीराच्या माणसांना गुरु न मानता प्रत्यक्ष सूर्य देवांना त्यांनी गुरु स्थानी मानून साधना, तळमळ, कष्ट, आणि महत्वाकांक्षा यांच्या जोरावर त्याने धर्नुविद्या पूर्णपणे आत्मसात केली.

परंतु त्याच्या या जिद्दीकडे फारसे कुणी पाहिले नाही. सर्वांनी त्याची घोर उपेक्षाच केली. तरीही त्या अवहेलनेकडे दुलर्क्ष करून कर्ण आपली वाटचाल करीत होता. मात्र नियती कठोर असते ती महत्त्वाकांक्षी व जिद्दी माणसांसाच्याच समोर कोणत्यान कोणत्या आव्हानाच्या रुपात सामोरीयेत असते. कर्णासमोर ही नियती अर्जुनाच्या रूपात होती. प्रेक्षणगृह प्रसंगी अर्जुन सर्वश्रेष्ठ धनुर्धर ठरतो आहे. हे समजल्या बरोबर कर्ण धर्नुविद्येतले आपले कौशल्य सर्वांसमोर प्रकट करून सर्वांना दाखवू दिपवून टाकतो. डोळे झाकूण आवाजाचा लक्ष्यभेद करीत असताना मात्र नियती आपले चक्र पुन्हा फिरविते व श्वानाच्या आवाजाचा लक्ष वेध न करता कर्ण त्या अगोदर एका पक्षिणीच्या आवाजाचा लक्ष भेद करतो. भीष्मा शिवाय कोणाला सुध्दा तो सूक्ष्मध्वनी ऐकू आलेला नव्हता. त्यामुळे कर्णाकडून खरा लक्ष भेद झाला नाही असे समजून अर्जुनाच्या गळ्यात विजयाची कमलपुष्प माला पडते. नियती आपले चक्र पुन्हा फिरविते.आणि कर्णांचे हेच कौशल्य व सामर्थ्य दुर्योधनाच्या घाऱ्या डोळ्यात बसले. कर्ण हा राजकुलातला नसल्याकरणाने त्याला अपमानित केलेले असते हीच संधी लक्षात घेऊन दुर्योधन त्याला अंगदेशाचा राजा म्हणून घोषीत करतो. परंतु याच प्रसंगात तो सारथी अधीरथाचा पुत्र असल्याचे सर्वाना समजते. भीमसुध्दा या वेळी कर्णाची कठोर शब्दात निर्भत्सना करतो. कर्ण मात्र या भयंकर मानहानीच्या क्षणी मुख झाकून घेतो व त्याच्या मनात सरळ तोंडावर उडी मारून कपाळ मोक्ष करून घ्यावा असा विचार प्रकटतो. पण वास्तवता ही क्रुर असते. कधी कधी ती माणसाला सरळ मरून सुध्दा देत नाही.[१६] कारण हा कर्ण अभेद्य कवच कुडंल धारी होता.

राजकुमारांपेक्षा क्षत्रियांपेक्षा जास्त सामर्थ्य व गुणवत्ता अंगी असताना व ती सर्वांपुढे सिध्द झाली असताना सुध्दा केवळ जन्माने सूत असल्याने कर्णाला कोणी ही वीर म्हणायला तयार नव्हते. अशा वेळी कर्णाला सावरले ते दुर्योधनाने व त्याला अनपेक्षितपणे अंगराज पद बहाल केले. त्यामुळे

कर्णांच्या मनात कृतज्ञतेचे भाव तरंगले व त्याने आपले सर्वजीवन आता फक्त दुर्योधनाच्या साठीच आहे. असा निर्धार केला. अर्थात या नंतर समाजाने दुर्योधन मित्र अंगराज कर्णाचा त्याच्या तोंडावर अपमान बंदकेला मात्र समाजाच्या लेखी कर्ण हा सूतच होता. हे सत्य कर्ण सुध्दा पुर्णपणे जाणून होता.

या सर्व प्रसंगानंतर कर्णाच्या मनात आणखी एक अपमानाचा प्रसंग बाणासारखा रूतला तो म्हणजे दुर्योधनाला द्रुपद राजाची यज्ञकन्या विशालाक्षी, शामल भावगंधित याज्ञसेनीला जिंकून देण्यासाठी ज्यावेळी कर्ण स्वयंवरात सामील झाला. कर्णाने स्वयंवरात शिव धनुष्याला हात घातला आणि द्रैपदी उद्गारली मी कोणत्याही सारथ्याची पत्नी वा सून होणे मान्य करणार नाही करण मी कोणी सूतकन्या नाही. तेव्हा कर्णाने विकटपणे हसून आपला अपमान गिळला.[१७]

जीवनात असे काही प्रसंग असतात की त्याक्षणी अपमान बाजूला ठेवून कर्तव्याची कास धरावीच लागते.[१८] या भावनेतून आणि परममित्र दुर्योधनासाठीच्या इच्छा पूर्ती करीत असताना कर्णाला आणखी एका घोर अपमानाला सामोरे जावे लागते. गुरू द्रोणाकडून ब्रह्मास्त्र विद्या मिळविण्याकरिता गेलेल्या कर्णाला द्रोण म्हणतात,'' तू क्षत्रिय नाहीस, अंगदेशाचा राजा झालास म्हणून स्वत:ला क्षत्रिय समजतोस की काय? व्याघ्राच कातंड पाघरल्यांन गर्दभाला कोणी व्याघ्र म्हणत नाही.[१९] अथवा गावच्या चौकात उभे राहून ओरडणाऱ्या सारमेयान वनराजाचा आव कधीच आणू नये.[२०]'' द्रोणाचे हे एक एक शब्द शूलाग्रा सारखे कर्णाच्या अंत:करणात घुसले काटे फड्यान झोडपल्या सारखत्याच मन आंक्रदू लागले तेंव्हा कर्ण उद्गारला,''जन्माला येणे हे दैवाच्या हाती आहे. पण पुरूषार्थ माझ्या दंडात आहे.[२१]

कुरूक्षेत्रावरील युध्दाच्यावेळी कर्णाचा सेनापती भीष्म 'अर्धरथी' असा उल्लेख करतात. तर युध्दाच्या सतराव्या दिवशी कर्णाच्या रथाचे सारथ्य करणारा शल्य सुध्दा त्याचा 'सूतपुत्र' म्हणून तेजोभंग करीत असतो. अशा अनेक प्रसंगाचे अत्यंत प्रभावी वर्णन शिवाजी सांवत यांनी ' मृत्युजंय' या कादंबरीत केले असून या सारख्या प्रसंगातून जणू ते माणसाचे मोठेपणहे त्याच्या जन्मावर अवलंबून नसून ते तो बाळगीत असलेल्या विचारावर अवलंबून असते. असे दाखवितात.

## ५) पराक्रमी कर्ण

मृत्युंजंय मधील कर्ण हा जणू पराक्रमाचा प्रतिकच होता. अनेक गुणांनी युक्त असणाऱ्या कर्णाच्या जीवनातील पराक्रम हा त्याचा सर्वात पहिल्यांदा प्रतीत येणारा गुण आहे. हस्तिनापूरात आल्यानंतर त्याने सूर्याला गुरू मानून धर्नुविद्या खड्ग गदा मल्लविद्या यात प्राविण्य मिळविले. तर मल्लाविद्ये मधील बाहुकंटक नावाच्या डावात त्याने विशेष प्राविण्य मिळविले होते. याच बाहुकंटकाचा

वापर करून कर्णाने 'कापिल्य' नगरीतील भानुमतीच्या स्वयंवरात महाबलाढ्य जरासंधाचा पराभव करून त्याला जीवदान दिले होते. कर्णाच्या याच कौशल्यावर भाळून जरासंधाने त्याला आपल्या राज्यातील मालिनीनगर देणगी म्हणून घोषित केले. कर्ण हा बालपण पासून शूर होता याचे वर्णन मृत्युजंय मध्ये आले आहे. सर्व मित्र मिळून खेळत असताना त्या मुलांच्या दिशेने अचानक एक खोंड येतो मात्र कर्ण इतर मूलांसारखा पळूण न जाता त्या मस्तवाल खोंडाला आपल्या बाहुबलाने नमवतो. युध्दशळेत प्रत्येक वर्षी एक मोठा यज्ञ केला जात व त्या यज्ञामध्ये बळी देण्यासाठी प्रत्येक शिष्य जंगलात जावून एखादा प्राणी आणीत. अशाच एका यज्ञासाठी जंगलातील सगळयात सामर्थ्यवान प्राणी म्हणून वाघाशी झुंज देऊन त्याच्या मुस्क्या बांधून त्याला पकडून आणतो.

कर्ण आणि दुर्योधन अरण्यात मृगया करण्यासाठी गेले असताना दुर्योधनाचा पाय एक अजस्त्र अजगर गिळतो. त्यावेळी त्या भयंकर अजगराशी झुंज देऊन कर्ण आपल्या परममित्राला जीवदान देतो.

प्रेक्षणगृह प्रसंगी कर्णाने आपल्या युध्द कौशल्याचे केलेले प्रदर्शन हे सुध्दा त्याच्या पराक्रमाची निष्कलंक साक्ष देते. विजयश्रीची माला जरी या प्रसंगात कर्णाच्या गळ्यात पडली नसली तरी कर्ण हा पराक्रमीच होता. याची या ठिकाणी साक्ष पटते. तसेच द्रौपदी स्वयंवरात ब्राह्मण वेशातील अर्जुनाशी कर्णाचा घनघोर संग्रम होता. साक्षात श्रीकृष्णाला मध्यस्थी करून त्यांचे युध्द थांबवावे लागते. कांदबरीतील हा प्रसंग कर्णाच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे.

यासर्वांमध्ये कुरूक्षेत्रावरील चाललेले युध्द व त्या युध्दातील अनेक प्रसंग कर्णाच्या पराक्रमाची साक्ष देतात. घटोत्कोच्याच्या असुरी शक्तीमुळे कौरवांकडील सैन्याचा पार धुव्वा उडतो. त्यावेळी कौरवसैनिक कर्णाकडे प्राणदान-अंगराज-दानवीर प्राणदान द्या !![२२]

अशी याचना करतात. शेवटी अर्जुनासाठी राखून ठेवलेली वैजयंती शक्ती कर्ण घटोत्कोच्यावर वापरतो व घटोत्कोच्याचा थरकविणारा असा वध करतो. एवढेच नव्हेतर ज्या भीष्मांनी त्याला अर्धरथी ठरविले त्याच गंगापुत्र भीष्मांनी कर्णाच्या पराक्रमाचा गौरव केलेला प्रसंग मृत्युजंय या कादंबरीत आला आहे. तुझा बाहुकंठक भीमाचे प्राणही कोंडून राहील इतका प्रभावी आहे. तू-तू साक्षात श्रीकृष्णा सारखा दैदिप्यमान आहेस[२३] हे भीष्मांचे उद्‌गार कर्णांच्या पराक्रमाची साक्ष देतात.

कुरूक्षेत्रावरील रथचक्र उद्‌धरणाच्या प्रसंगाच्या वेळी सुध्दा कर्णाचा अंगभूत पराक्रमाची साक्ष पटते. दलदलीत अडकलेल्या रथाचे चाक बाहेर काढण्यासाठी कर्ण आपल्या हातातील धनुष्य बाजूला ठेवतो. वनि:शस्त्र होवून रथाचे चाक उचलत असतो. अशा नि:शस्त्र कर्णावरच श्रीकृष्ण अर्जुनाला बाण

चालवावयास लावतो. कारण रथचक्र उद्धरून कर्ण ज्यावेळी पुन्हा जैत्र रथावर झेपविल तेव्हा अर्जुनांच खरोखरच काहीही खरं नव्हतं[२४] श्रीकृष्णाच्या मनातील हाच विचार कर्ण केवढा आकाशवीर होता हे कळते.

याशिवाय कर्णाच्या पराक्रमाची साक्ष देणारे अनेक छोटे मोठे प्रसंग शिवाजी सावंत यांनी 'मृत्युंजय' मध्ये वर्णन केले आहेत. त्यात कर्णाच्या दिग्विजयचे शोणाच्या मुखातून केलेले वर्णन त्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

## ६) दानकीर्तीच्या मोहात फसलेला कर्ण –

कर्णा जवळ जे काही गुण होते. त्यात कर्णाच्या दानाचा उल्लेख आर्वजून केला जातो. महाभारतकारांनी 'याचकाचा कल्पवृक्ष' असेही वर्णन कर्णाचे निर्वाण झाल्यानंतर केले आहे. दातृत्वात तो असाधारण शूर होता. म्हणूनच कर्णाला 'दानशूर' असे म्हटले जाते.[२५] दातृत्वाच्या बाबतीत कर्ण कमालीचा जागरुक होता. कारण ते त्याचे व्रत होते. असेच सावंतांनी कादंबरीत दाखविलेले आहे.

दिविग्जय करून आल्यानंतर कर्णाने जे दान सत्र केले ते तर अत्यंत अतुलनीय असे होते. या दिग्विजयात त्याला जी संपत्ती प्राप्त झाली होती. त्यातील पुरेशी संपत्ती दुर्योधनाच्या पायावर घालून उरलेली संपत्ती कर्णाने राजवाडया समोरच्या प्राकारी चौकातल्या दगडी चौथऱ्यावर बसून जो जी मागेल त्याला ती वस्तूच्या रूपात दान देत होता. जी संपत्ती वणवण भटकून त्यानं मिळवली होती. ती तो हसत मुखाने देत होता. ज्यावेळी वाचकांची रांग संपत होती त्यावेळी तो अन्न ग्रहण करीत होता. एके दिवशी कर्ण दान सत्र करीत असताना एक याचक त्याच्याकडे वाळक्या लाकडाची याचना करतो. परंतु दिवस पावसाळ्याचे असल्या कारणाने वाळकी लाकडे मिळणे शक्य नव्हते. परंतु कर्णाला दान या शब्दाची जणू मोहिनीच पडली होती. कर्ण आपल्या महालात जातो व महालातील दोन चंदनी तुळव्या तोडून आणून याचकाला दान देतो.

इंद्र एका विशिष्ट हेतूला अनुसरून कर्णाच्या या दानी स्वभावाचा फायदा घेण्यासाठी त्याची अभेद्य कवच कुंडले दानात मागतो. वास्तविक अशा दानापासून कर्णाला परावृत्त करण्याचा प्रयत्न प्रत्यक्ष सूर्यदेव व शोण करतात. मात्र कीर्ती कलंकीत करून मिळणारी जीवन मी कधीही स्वीकारणार नाही.[२६]

असे म्हणून तो इंद्राच्या झोळीत हे महान दान टाकतो. त्याच्या ह्या दानी स्वभावाला पाहून इंद्र सुद्धा स्तिमित होतो.

कर्णाच्या व्यक्तीमत्वात शुद्र : हीन असे काहीच नव्हते. त्याच्या विचारांना कृतींना क्षुद्रत्वाचा स्पर्श ही नव्हता म्हणून तर त्याने आपली माता कुंतीला सुद्धा तिच्या पाची पुत्राच्या जीवनाचे अभय दिले होते. कर्णाने आपला हा दानी स्वभाव कुरूक्षेत्रा सारख्या रणांगणावर सुध्दा सोडला नव्हता. भीमपुत्र घटोत्कोचाने युध्द भूमीवर भयंकर संहार केला. त्यावेळी दुर्योधनाने कर्णाला वैजयंती शक्तीचा वापर करण्याचे सांगितले. मात्र ही शक्ती जीवनभराच्या द्युतातून केवळ अर्जुनासाठीच राखून ठेवली आहे. असे त्याने सांगितले व दुर्योधनाच्या म्हणण्याला नकार दर्शविला मात्र लाखो कौरव सैनिकांनी ज्यावेळी कर्णाकडे घटोत्कोचाच्या भयाने केविलवाण्या स्वरात आम्हाला प्राणदान द्या ! प्राणहान-अंगराज दानवीर प्राणदान द्या!![२७]

अशी याचना केली. त्यावेळी कर्णाने दानाच्या प्रेरणेतून वैजयंती शक्तीना वापर करून कौरव सैन्याचे रक्षण केले.

अंगराज कर्णाचे दातृत्व इतरांच्या दातृत्वापेक्षा आगळे होते. याचा अत्यंत ह्न्दयस्पर्शी प्रसंग लेखकाने कादंबरीच्या अखेरीस रंगविलेला आहे. कुरूक्षेत्रावरील युध्दात वीरगती आलेल्या आपल्या पुत्राच्या अंतिम संस्कारासाठी एक वृध्द याचक याचना करीत असतो.त्याच्या आवाज अर्जुनाच्या बाणाने दग्ध झालेल्या कर्णाच्या कानावर पडतो. त्या वेळी कर्ण त्या वृद्ध याचकाला जवळ बोलविता व चित्रसेनाला आपल्या मुखातील सोन्याने मढविलेले दोन दात पाडून देण्याची आज्ञा करतो व पाडलेले दात याचकाला देतो. मात्र याचक रक्ताने माखलेले दान स्विकारायला तयार नसतो. अशा वेळी कर्ण आपल्या अश्रुंनी दान स्वच्छ करतो व याचकाला समाधानी करतो.

जगात अनेकांनी दान केले असेल पण-पण मरणाच्या दारातील एवढ चित्त थरारक उत्तुंग एकनिष्ठ अजोड दान तो एकटाच करू जाणत होता.[२८]

म्हणून तो एक उदात्त आणि भव्य गगनचुंबी विचारांचा पुरूष होता,असे शिवाजी सावंत यांनी दाखविलेले आहे.

## ७) प्रमादामुळे जीवन मूल्य गमावून बसलेला कर्ण –

'मृत्युंजय' या कांदबरीत शिवाजी सावंत यांनी कर्णाला पराक्रमी पण भोळा, भाबडा दयाळू आणि सरळ मनाचा. कोणत्याही कपटात कधीही सामिल न होणारा असा रंगविलेला आहे. म्हणून तर पांडवांना लाक्षागृहात जाळण्याच्या कुटिल डावात दुर्योधनाने कर्णाला सामिल करून घेतले नव्हते. कारण त्याच जीवन खऱ्या धर्नुधरासारखा होत. चापातून सुटलेल्या बाणासारख्या नाकासमोर जाणार ! राजकारण त्याचा प्रांतच नव्हता! त्यामुळे कोणालाही जाळण्याची कल्पना त्याला कधीच पटली नसती ! आपल्या मातापित्यांना घेऊन

त्यात तडक चंपानगरीच गाठली असती. याची खात्री दुर्योधनाला होती.

या वरील प्रसंगातून लक्षात येते की, कर्ण कपटी कारस्थानी नव्हता. तरीही त्याच्या हातून दोन मुख्य अपराध घडले. पहिला म्हणजे ज्या घटनेमुळे कर्ण हा पराकोटीचा नीच आणि कमालीचा निंदय ठरला. तिरस्करणीय ठरला तो म्हणजे 'द्रौपदी वस्त्राहरणाचा' व दुसरा अपराध म्हणजे परशुरामाशी त्याने केलेले असत्य भाषण. यातील दुसऱ्या अपराधाची, पापाची शिक्षा कर्णाला लगेचच मिळाली, परशुरामांना वस्तुस्थिती समजल्यावर त्यांनी कर्णाला शाप दिला. मात्र द्रौपदीच्या केलेल्या अपमानांची खंत त्याचा मनात सतत बोचतच राहिली.

'मृत्युंजय' या कादंबरीत मात्र लेखकाने ही पापे करीत असताना कर्णाच्या अंत:करणात जो संघर्ष सुरू होता त्याचे चित्रण करून कर्णाच्या हातून जे प्रमाद घडेल त्याला संपूर्णपणे कर्णच जबाबदार आहे, असेन दाखविता काही काही प्रसंगच माणसाच्या संयमाचे बंध फोडण्यासाठी नियतीने योजलेले असतात.[२९]

असे सुचित केले आहे. कर्णाच्या हातून हा अपराध घडण्याच्या अगोदर काही घटना घडलेल्या आहेत. प्रेक्षणगृहात भीमाने कर्णाच्या हीन जातीवरून केलेला उपहास, स्वयंवरात द्रौपदीने सर्वासमक्ष सूत म्हणून कर्णाचा केलेला उपहास, अथवा त्याच स्वयंवरानंतर अर्जुना कडून कर्णपुत्र सुदामनाचा झालेला वध या सर्व प्रसंगांची धावती उजळणी लेखकाने कर्णाच्या मनोव्यापारातून केली आहे. त्यामुळे कर्णाला द्रौपदी व पांडवांचा होणारा अपमान सुखवतो. मात्र त्याच वेळी कर्णाच्या मनातला सूर्य शिष्य जागा होतो. ऊठ हा अन्याय आहे. ऊठ आणि थोपव या अन्यायाला ! प्रकाशाच दिव्य साम्राज्य सोडून तू ही अंधकाराच्या भयाण गर्तेकडे कुठ चाललास? सूड प्रतिशोध ही हलका मनाची क्षुद्र लक्तरं ! फेकून दे ती ! फेकून दे ! उठ ![३०]

मात्र क्षणात अपमानाच्या वाग्बाणांनी काळीज करपलेला सारथी प्रबळ होतो. त्यामुळे मूढता, बधिरता, किंकर्तव्यता या मनात दाटलेल्या धुक्यात तो स्वत:ला हरवून बसतो आणि तपस्या व तत्वचूती या दोन अग्रामध्ये तो ताणला जातो. असे चित्रण कादंबरीत करण्यात आले आहे.

शेवटी कर्ण आपल्या मनाचे सर्व धागे एकत्र बांधतो. त्या धाग्यात सुतपुत्रकर्ण, कुरूंचा योद्धा कर्ण, अपमानित कर्ण, सूडांध कर्ण या सगळयांना करकचून बांधून त्यांची शरीर एका कोनाडयात फेकून देतो. आणि एका स्त्रिची लज्जा रक्षण करण्यासाठी सूर्य शिष्य कर्ण उभा ठाकतो. परंतु अपमानाची ठिणगी पुनश्च कर्णाच्या मनाला वेदना देते. प्रत्येकाच्या आसनासमोर याचना करणारी द्रौपदी कर्णाकडे मात्र या ही परिस्थितीत मदतीची याचना करीत नाही. सहस्त्र विजा कोसळाव्यात अशी कर्णाची अवस्था होते. सुतपुत्र सारथी परत कर्णाच्या मनोभूमीवर आपले अश्व उथळू लागतो. त्यांच्या टाचेखाली संयम,विवेक, औदार्य, सहदयता तुडविली जाते.

सूर्यपुत्राच्या मस्तकावर सारथीपुत्र पाय देऊन उभा राहतो. धुंदपणे मुखात येईन ते बोलतो व द्रौपदीला पाच पतींशी रमणारी विलासीनी, वारांगना, कुलटा सुद्धा म्हणतो. द्यूतात धर्म आपले सर्व ऐश्वर्य आपले प्रियतम बंधू व सौंदर्यवती द्रैापदी यानाच हरवून बसला. पण कोणताही डाव न खेळता कर्ण मात्र या द्यूतात मानवी जीवन मूल्येच गमावून बसला.

या अपराधाची खंत कर्णाला सतत बोचत राहिली. विकर्णाला विरोध करणारे भाषण केल्यानंतर लगेच कर्णाच्या मनात विचार आला की, तो या प्रसंगी धुंद मद्यपी सारखा बोलला. थोडक्यात कर्णाच्या मनातील व्दंव्दात सारथी प्रबळ होतो. कर्णाच्या हातून हा प्रमाद घडताना लेखकाने कर्णाची अंर्तबाहय पार्श्वभूमी अत्यंत प्रभावीपणे मांडलेली आहे.

कर्णाच्या हातून जो दुसरा अपराध झाला तो मात्र कर्णाच्या मित्रप्रेमामुळेच अशी पार्श्वभूमी लेखकाने या ठिकाणी निर्माण केली आहे. कवच कुंडलांच्या दानामुळे कर्णाची शक्ती कमी होते. अर्जुनाशी लढताना कर्णाकडे अंगभूत कौशल्या शिवाय काहीही नसते. अर्जुनाकडे मात्र ब्रहमास्त्र असते. तेव्हा दुर्योधनाच्या हट्टामुळे कर्ण द्रोणाकडे ब्रहमास्त्र मागायला जातो खरा पण त्या ठिकाणी त्याचा अपमान होतो. या अपमानाचे उट्टे काढण्यासाठी कर्ण महेंद्र पर्वतावर जाऊन परशुरामाशी खोटे बोलून ब्रहमास्त्र मिळवितो. या दोन्ही प्रसंगांचा जर सारासार विचार केला तर कर्णाचा द्रौपदीने अगोदर अपमान केला नसता तर कर्णाच्या हातून प्रमाद ही घडला नसता. दुसऱ्या अपराधाच्या वेळी कर्ण मात्र दुर्योधनाच्या मित्र प्रितीच्या आहारी जाऊन अपराध करतो. म्हणजे दान कीर्तीचा मोह, पुरूषी अहंकार आणि मित्र प्रेम हे त्रिगुण कर्णाच्या नाशास कारणीभूत ठरताना दिसतात.

'मृत्युंजय' या कादंबरीत शिवाजी सावंत यांनी कर्णाच्या हातून केवळ दोनच प्रमाद घडलेले दाखविलेले आहेत. त्यातही कर्णाला पूर्णपणे जबाबदार धरलेले नाही तर कर्णाच्या वर्तनाप्रमाणे भावनोद्रिकाचे व सूडभावनेचे तसेच अतिरिक्त स्वामीनिष्ठा, उपकार कर्त्या राजाच्या ऋणांची परत फेड करण्याची वातावरण निर्मिती केली आहे.

मूळ महाभारताच्या संहितेत दुर्योधनाच्या प्रत्येक कटकारस्थानात कर्ण सामील असलेला दिसतो. या मूळ संहितेतील प्रसंगात मात्र लेखकाने बदल करून कल्पनेच्या साहाय्याने कर्णाला निर्दोष सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र प्रमाद हा प्रमादच असतो. तो कोणत्या व्यक्तिकडून कोणत्या परिस्थितीत केला गेला आहे. या वर त्या प्रमादाची तीव्रता अवलंबून नसते. या तत्वाला या ठिकाणी लेखकाने मात्र छेद देण्याचा प्रयत्न केलेला मनाला जाणवल्या शिवाय रहात नाही.

## ८) तत्वनिष्ठ व सत्प्रवृत्त कर्ण :-

'मृत्युंजय' या कादंबरीतील कर्ण लेखकाने तत्वनिष्ठ, साप्रवृत्त, निष्कपट असा दाखविलेला आहे. कुटिल कारस्थानच कपटी राजकारण हा कर्णाचा स्थायीभाव नव्हे.[३१]

म्हणून तर कर्णाला दुर्योधनाने आपल्या कोणत्याही कटकारस्थानाचा सुगावा लागून दिला नाही. दुर्योधन हा कपटालाच कौशल्य हे गोंडस व सुसंस्कृत नाव देऊन पांडवाचा निप्पात करण्याच्या अनेक युक्त्या शोधून काढत व त्या बद्दल काही वेळा कर्णाशी चर्चा देखील करीत अशा वेळी कर्ण त्याला मला एकाच वेळी पाच जणाबरोबर सरळ व्दंव्द खेळायला सांग ! मी त्यांना केळीच्या गाभा पिचतो तसा उभा पिचून काढीन. पण कोणत्याही कपटांनी मी काहीही करणार नाही![३२]

असे आपले मत प्रदर्शन करीत असे तर शकुनी मामांना कर्ण ज्या हातात खड.ग घेऊन शत्रूला समरांगणात खडे चारावेत त्याच हातात त्या कवड्या घेऊन तुम्ही दैवाचा पाश पांडवांच्या कंठाभोवती टाकू पाहता हात हे आपल्याला शोभादायक नाही.[३३] असे म्हणून फटकारताना दिसतो.

द्युत प्रसंगी द्रौपदीचा आपल्या हातून घडलेल्या अपमानाची सल कर्णाला बाणासारखी आयुष्यभर सलताना दिसते. या बद्दल तो श्रीकृष्णाकडे माफी देखील मागताना दिसतो. एवढेच नव्हे तर पांडवांच्या वर अन्याय झालेला आहे. हे देखील त्याला त्याचे मन सांगित असते. कारण तो सुद्धा अनेक अन्याय सहन करीत आलेला दिसतो. कर्णाने प्रत्येक घडलेल्या प्रसंगानंतर प्रकट केलेले आत्मचिंतन त्याच्या निष्पाप मनाची साक्ष देताना दिसते. दुर्योधन शकुनी मामाच्या प्रत्येक कपटी कारस्थानाला बळी पडतो आहे. याचे देखील कर्णाला वाईट वाटत असते. मात्र तो मित्र प्रितीमुळे हतबल असतो.

दुर्योधन कर्णाचे वर्णन करीत असताना म्हणतो त्याच्या अनेक मनमोहक गुणांनी त्यानं या राजनगरीतील असंख्य नगरजनांची मन जिंकली आहेत. असे म्हणतो, या वरूनच कर्णाच्या सरळ व दयाळू स्वभावाची प्रचिती येते. कर्णाने दुर्योधनाला कित्येकदा कपटाचा मार्ग सोडून पराक्रमाचा मार्ग धरण्याची आर्जव केलेली दिसते.

कर्णाची क्षमता खऱ्या अर्थाने जाणली होती ती दुर्योधनाने आणि श्रीकृष्णाने. दुर्योधनाने तर केवळ कर्णाच्या जीवावरच पांडवांचा नाश करण्याचे मनसुबे रचलेले कादंबरीत दाखविलेले आहेत. श्रीकृष्णाने देखील कर्णाला पांडवांच्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला होता. कारण एक कर्ण पांडवांच्या बाजूने उभा राहिला असता तर पांडवांच्या विजयाच्या निश्चितीपेक्षा दुर्योधनाची बाजू अधिक दुर्बल झाली असती हे श्रीकृष्णाने पूर्णपणे जाणले होते. कर्ण भेटीत श्रीकृष्ण कर्णाच्या ब्रहमचर्य, अर्घ्यदान, आत्मसंयम, दानसत्र, धर्मज्ञान याची

वाखाणणी करतो व प्रत्येक पांडव एका एका गुणात श्रेष्ठ आहेत. तू तर सर्व गुणांनी युक्त आहेस! पहिला पांडव हे सार्थ नामाभिधान तुलाच शोभण्या सारखं आहे [३४] असे म्हणतो.

अशा या कर्णाच्या अंतिम संयमी श्रीकृष्ण आपल्या उत्तरीयाने कर्णाचा धुळीत माखलेला मुकूट स्वच्छ करतो व कर्णाच्या महानिर्वाणावर आपले अश्रु सिंचन करतो. श्रीकृष्णाच्या या कृतीतून कर्णाचे मोठेपण सिद्ध होते. शिवाजी सावंत यांनी 'मृत्युंजय' या कादंबरी मध्ये कर्णाच्या अंतरंगात शिरून त्याच्या भावभावनांचा वेध घेऊन त्यांना भावलेला कर्णच कादंबरीच्या अंगोपांगी सूक्ष्मतेने, तरलतेने आणि प्रभावाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि तो यशस्वी झाला आहे हे या कादंबरीच्या यशाचे गमक आहे.

## ९) मित्रत्वाचा आदर्श कर्ण :-

'मृत्युंजय' या कादंबरीत लेखकाने कर्णाची दुर्योधनाप्रती असणारी गाढ मैत्री अनेक प्रसंगातून लिलया सिद्ध केली आहे. हस्तिनापूरात आल्या दिवशी कर्णाच्या समोर दुर्योधन येतो. त्याची ऐटदार चाल कर्णाला आवडते. त्यातच दुर्योधन कर्णाच्या कवच कुंडलांचे कौतुक करतो. जे कौतुक इतर कुणीही करीत नाही. त्यामुळे साहजिकच कर्णाच्या मनात दुर्योधनाबद्दल वेगळा भाव तयार होतो. आणि अनपेक्षितपणे याच दुर्योधनाने कर्णाला दिलेले अंगराज हे पद त्यामुळे तर कर्ण आपले जीवनच दुर्योधनाच्या पायावर ठेवतो. आजन्म तुझ्या पाठीशी राहीन! प्राण गेला तरी कधीही परतणार नाही. [३५] असे वचन देतो. साहजिकचत्वचननिष्ठा व तत्तवनिष्ठा हे कर्णाच्या जीवनाचे प्रमुख सूत्र असल्याने तो दुर्योधनाशी प्रामाणिक मैत्री करीत असतो असे कांदबरीत दाखविण्यात आले आहे.

कर्ण आपल्या मित्रप्रेमामुळे दुर्योधनाच्या प्रत्येक कार्याला पाठिंबा देणे हे आपले जिवित कार्य समजत असतो. म्हणूनच तर तो आमंत्रण नसताना दुर्योधनाच्या आग्रहाखातर द्रुपदाची कन्या द्रौपदी हीच्या स्वयंवरात सहभागी होण्यासाठी जातो. तसेच ज्या द्रोणांनी त्याला सूत म्हणून सर्व प्रथमता अपमानीत केले त्या द्रेणाचार्याकडे कर्ण ब्रहमास्त्राचे दान मागायला जातो. तेव्हांचे त्याचे उद्गार त्याची मित्र प्रिती किती प्रामाणिक होतो हे सुचित करतात. जे मी स्वत:साठी कालजयी केल नसतं ते केवळ तुझयासाठी मी करीन! केवळ तुझ्यासाठी! तुझ्या माझ्या मैत्रीसाठी. [३६] कर्णाला आपल्या जीवनात अनेक अपमान बाजूला ठेवावे लागले ते केवळ कर्तव्याची कास धरण्यासाठीच व मैत्री टिकविण्यासाठी.

कर्णाच्या मैत्रीची खरी कसोटी लागली ती श्रीकृष्णा कडून ज्या वेळी कर्णाला आपले जन्म रहस्य कळले तेंव्हा मात्र ह्या ही कसोटीच्या प्रसंगी कर्णांनी आपल्या मनात सुकाणूची दिशा बदलली नाही. कारण ज्या दुर्योधनाच्या सहवासात आयुष्यभर कर्ण वावरला वाढला ज्याच्या आश्रयाने राज्य व इतर मानसन्मान भोगले तो कर्ण युद्ध

अटळ झाल्यानंतर सम्राटपद किंवा प्रत्यक्ष इंद्रपद जरी त्याला कोणी देऊ केल असते. तरीही दुर्योधनाशी अखेरच्या क्षणी तो कृतघ्न झालाच नसता कारण मुखातून आलेला शब्द निद्रेतला जरी असला तरी तो सत्य करून दाखविण्याचा कर्णाचा स्वभाव होता.

दुर्योधन मात्र कर्णावर प्रामाणिक मित्र प्रीति करताना दिसत नाही. पवित्र आणि प्राचीन राजसिंहासनापासून पांडवांना दूर ठेवण्याचा द्यूतात कर्ण हा दुर्योधनाच्या हातचे एक प्रभावी शस्त्र आहे. असे दुर्योधन मानीत होता. याचाच अर्थ कर्ण-दुर्योधनाच्या मैत्रीत कर्णाच्या बाजूने एकनिष्ठता, प्रांजळपणा आहे, परंतु दुर्योधनाच्या बाजून हे दिसत नाही.

थोडक्यात सावंतांच्या कर्णाच्या व्यक्तिमत्वात द्रुष्टता, खलत्व, कपटकारस्थान व धूर्तपणा हे दुर्गुण अंशत: ही आढळत नाहीत. या उलट तो दयाळू, नैतिक मुल्ये जपणारा, सत्प्रवृत्त असा अनेक गुणमंडित असलेला दाखविला आहे. मात्र नशिबाने त्याला दुर्योधनाच्या दोस्तीत कोंबल नि त्यामुळेच त्याची सारी शोककथा झाली.[३७] त्यामुळेच 'मृत्यूंजय' या नायक कर्ण वाचकांच्या मनावर अधिराज्य करतो.

### १०) सरळ मनाचा कर्ण :-

'मृत्युंजय' या कादंबरी मध्ये सूर्य किरणांचा प्रतीकात्मक म्हणून कर्णाची व्यक्तिरेखा मांडल्यामुळे सरळपणा हा कर्णाचा स्थायीभाव ठरला आहे. एकटा दुर्योधन सोडला तर खरोखरच कुणी मला प्रेमाचा जिव्हाळा दिला नव्हता.[३८] या भावनेतून दुर्योधनाच्या मैत्रीत जाळयात अडकलेला कर्ण हा अगतिक सारखा दुर्योधनामागून फरफटत जात होता. वास्तविक कर्णाच्या मनात दुर्योधनाबद्दल जो भाव होता. ती कर्णाची पूर्णपणे फसवणुकच असल्याचे लक्षात येते. कारण दुर्योधनाने कर्णाला केवळ आश्रिता शिवाय दुसरे काही मानलेच नाही. कर्णाच्या हातून द्रौपदी वस्त्र हरणाच्या प्रसंगात जे काही प्रमाद घडले. त्यामुळे हस्तिनापूरातील लोक कर्णालाही कपटी मानू लागले. असे असूनही कर्णाला केवळ दिलेल्या वचनाच्या अगतिकतेतून दुर्योधनाला साथ द्यावी लागली. विष्णुयाग यज्ञाच्या वेळचे कर्णाचे आत्मनिवेदन याबाबतीत विशेष लक्षात घेण्यासारखे आहे. माझे जीवन म्हणजे त्या नौकेतील केवळ एक डोलकाठी ठरली होती! मध्ये उभी असलेली तरीही स्वयंभू स्थान नसलेली! परिस्थितीच्या वायू झोताबरोबर डोलणारी! नकाराची मान हालवीत नौकेबरोबरच चालणारी! मी दुर्योधनाला सोडू शकत नव्हतो.[३९]

कर्णाच्या वरील निवेदनातून कर्ण आपली अगतिकता पूर्णपणे जाणून होता हे लक्षात येते. परंतु 'मृत्युंजय' या कादंबरीत शिवाजी सावंतांनी कर्णाच्या या अगतिकतेकडे फारसे लक्ष न देता कर्णाने केवळ एक कर्तव्य व तत्वनिष्ठा, वचननिष्ठा यासाठीच दुर्योधनासारख्या द्रुष्ट व कपटी राजाला साथ दिली. तसेच कर्णाने आपले

जीवन सर्वस्व दुर्योधनाला अर्पण केले होते. म्हणजेच सूर्य किरण सरळ असते तसे त्याभोवती तेजाचे उदात्त वलय असते. कर्णाच्या व्यक्तिमत्वाला तेजाचे उदार वलय होते. असे दाखविण्यात आले आहे.

## ११) तटस्थ कर्ण :-

'मृत्युंजय' या कादंबरीतील कर्ण हा जरी काही वेळा अगतिक भासत असला तरी तो तत्वनिष्ठ व तटस्थ अंत:करणाचा एक महापुरूषच होता. त्यामुळे दुसऱ्याच्या कपटी हेतूला सुद्धा तो मोठया मनाने सामोरा जाताना दिसतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे इंद्राला कर्णाने दिलेले कवच कुंडलांचे दान, दुर्योधनाने जरी कर्णाचा सुखासाठी राज्यप्राप्तीसाठी कर्णाचा वापर केला होता. व ही गोष्ट जरी कर्णाला समजली असती तरी कर्ण दिलेल्या वचनाला जाणणारा असल्या कारणाने त्याने दुर्योधनाचीच बाजू उचलून धरली असती. आपले जन्मरहस्य कळून सुद्धा कर्ण पांडवांशी प्राणपणानेच लढताना दिसतो. कर्णाचा हाच तटस्थपणा (अलिप्तपणा) लेखकाने अत्यंत समर्थपणे कादंबरीत चित्रीत केला आहे.

कर्णाला आपल्या प्राणापलीकडे कीर्ती प्रिय होती. म्हणून तर त्याने ज्या कवच कुंडलामुळे कर्ण अजिंक्य होता ती कवच कुंडले सुद्धा केवळ कीर्तीसाठी इंद्राला दान दिली. यातच कर्णाने आपली 'दानवीर' ही उपाधी सार्थ ठरविली.

कर्ण ज्या प्रमाणे कीर्ती परायण होता. त्याप्रमाणे तो वचनाची निष्ठा आयुष्यभर कठोरपणे पाळणारा मित्र देखील होता. कारण वचन हा त्याने मानलेला त्याच्या जीवनातील एक मानबिंदु होता. तसेच तो आपल्या कुटूंबात रमणारा कुटूंबवत्सल महापुरूष सुद्धा होता. परंतु 'दान' या शब्दाची त्याला वेगळीच भुरळ होती. 'दान' या शब्दाचा उच्चार करताच तो देहभान विसरून दान देण्यासाठी आतूर होत असे. त्याच्या या दानी स्वभावाला कोणतीच परिसिमा नव्हती. याची प्रचिती त्याने मृत्यूसमयी जे दान दिले त्यावरून येते.

त्याच्या या स्वभावामुळेच कर्ण-श्रीकृष्ण भेटीत श्रीकृष्णाने कर्णाची अपार स्तुती केली असून कर्णाला मी ही तुझा अनुचर होईन.[४०] असे म्हणले आहे. अशा ह्या स्वभावाच्या कर्णाचा ज्या भीष्मांनी 'अर्धरथी' असा उल्लेख करून अपमान केला त्या भीष्मांच्या वधाच्या वेळी कर्ण व्याकुळ झाला. तर ज्या द्रोणांनी त्याला आपला शिष्य बनविला नाही व उलट त्याचा गर्दभ सारमेय असा उल्लेखही केला. त्या गुरू द्रोणांच्या मृत्यूमुळे सुद्धा कर्ण विव्हळ झालेला असे कादंबरीत चित्रण करण्यात आले आहे. म्हणजेच कर्णाने कुंती मातेचे आपल्या बाबतचे सर्व अन्याय निपुटपणे सहन करण्याचा वारसा जणु उचललेला दिसतो. म्हणूनच थोरला पांडव म्हणून घेण्याची पात्रता फक्त कर्णाचीच होती असे लेखकाने कर्णाचे उदात्तपण चित्रीत केले आहे.

## १२) कुटूंबवत्सल कर्ण :-

'मृत्युंजय' याकादंबरीत दाखविण्यात आलेला कर्ण हा एक कुटूंबवत्सल पुरूष म्हणून देखील लेखकाने वाचकांच्या समोर उभा केला आहे. त्याचे बालपण चंपानगरीत अतिशय सुखा समाधानाने गेले आहे. अधिरथ, राधामाता व शत्रुतपन हे त्याचे कौटुंबिक विश्व होते. या शिवाय त्याला 'वृकरथ' नावाचा आणखी एक बंधु होता मात्र तो विराटाच्या राज्यात राहणाऱ्या मावशीकडे रहात होता. 'शत्रुतपन'उर्फ 'शोण' हा तर कर्णाचा भावविश्वच असावा असे चित्रण कादंबरीत आले आहे. कर्णाच्या प्रत्येक कार्यात त्याला मदत करणारा शोण होता. अशा शोणाच्या मृत्यूमुळे तर कर्णाला आपल्या जीवनाचा सुखदु:खाचा एकमेव साथीदार सोडून गेल्याचे अपार दु:ख झालेले दाखविण्यात आले आहे. याच शोणाच्या आठवणीने कर्ण बऱ्याचदा विवश देखील झालेला आहे. कर्ण ज्याप्रमाणे एक आदर्श बंधू होता त्याप्रमाणे तो एक आदर्श पुत्र सुद्धा होता. म्हणून तर अंगदेशचा राजा झाल्यानंतर कर्णाला आपल्या अधिरथ बाबांची आठवण तर आलीच त्यासोबत त्याचा कंठ आपल्या पित्याने आपल्यासाठी घेतलेल्या अपार कष्टांच्या स्मृतीनं दाटून आला.[४१]

कर्णाच्या पराक्रमाचा सार्थ अभिमान असणारी वृषाली ही कर्णाची समजुत दार सहचारिणी दाखविण्यात आली आहे. तिच्या मनात कर्णाच्या व्दितीय भार्या 'सुप्रिया' बद्दल कोणताही सवती मत्सर भाव नव्हता. कर्णाच्या मनातील अपमानाचे सुर सौम्य करण्याचा प्रयत्न करणारी वृषाली आहे. कर्णाच्या प्रत्येक कृतीचा प्रगल्भपणे विचार करू शकणारी ती बुध्दिमान स्त्री होती. कर्णाला सुदामन, वृषसेन, वृषकेतु, आणि वृषभानु असे चार पुत्र होते. सुदामन हा अर्जुना बरोबरच्या युद्धात वधला होता. त्याच्या आठवणीने सुद्धा कर्णाच्या मनात दु:खाचे आवेग तयार होताना दिसतात. तर आपल्या सर्वात लहान पुत्राबरोबर तो बोबडे बोल बोलताना सुद्धा दिसतो.

एकूणच सूर्यदेव, महाराज पांडू व अधिरथ असे तीन पिता व कुंती, राधामाता व गंगा यांचे मातृत्व लाभलेल्या कर्णाचे कौटुंबिक जीवन अत्यंत सुखी होते. त्याचा दुर्योधनाशी जेवढा स्नेह होता तसाच स्नेह त्याने आपल्या परिवारावर सुद्धा केलेला दिसतो. माता आणि पत्नीचा स्नेह हा तर कर्णाचा जीवनाधार होता.

'मृत्युंजय' मध्ये कर्णाला एक प्रेमळ आदर्श पिता, पती आज्ञाधारक पुत्र कर्तव्यदक्ष बंधू व स्वच्छ मनाचा प्रामाणिक मित्र अशा अनेक विध भूमिकेत समर्थपणे उभे करण्याचा प्रयत्न शिवाजी सावंत यांनी केला आहे.

कर्णाच्या निधनाच्या वेळी त्याच्या मुखातून ली ..... ली ...... माता ...... माता ..... ण ... न अशी अक्षरे बाहेर पडत होती या अक्षरामधून तो कदाचित वृषाली,कुंतीमाता, शोण, अर्जुनाची आठवण काढताना दिसतो. इतकी त्याची आपल्या कुटूंबियांवर आंतरिक आस व आर्तता होती.

एकंदर कुमार भूमीवर अंत्य संस्कार करून घेऊन कर्ण रूपी व्यथा या जगात पुन्हा कधीही जन्मू नये याची काळजी घेणारा मृत्यूंजय कर्ण. कादंबरीत संपन्न व्यक्तिमत्वाचा धीरोदात्त पुरूष वाटतो. त्याच्या जवळ विचारीपणा, दानशूरता, निष्ठा आणि नि:स्वार्थी असे महान गुण आहेत त्याला संपत्ती व पदाची तिळमात्र अभिलाषा नव्हती. तरीही कर्णाच्या जीवनाची शोकांतिका झालेली दिसते. मात्र ही शोकांतिका एका महानायकाची ठरते. कारण कर्ण स्वत: अनेक गुण मंडित असून ही नशिबाने त्याला दुर्योधनाच्या सहवासात गुंतविले. म्हणून 'मृत्युंजय' ही कर्णाची शोकांतिकाच असलेली दिसते. त्यामुळे कर्ण हा सर्व सामान्य वाचकाला आपलाच अंश असल्यासारखे भासते.